| | |
|---|---|
| MHYA190003342017 | दाखल दिनांक – ३०.०३.२०१७<br>नोंदणी दिनांक – ३०.०३.२०१७<br>निकाल दिनांक – २२.०४.२०२६<br>कालावधी – ०९ वर्षे, ०० म. २३ दि. |

**२ रे प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, राळेगाव यांचे न्यायालयात.**

**(पिठासीन अधिकारी श्री. रामचंद्र दत्तात्रय माने)**

**नि.फौ.ख.क्र.३८/२०१७** **नि. क्र. ५२.**

**फॉर्म – अ**

| | |
|---|---|
| तक्रारदार / फिर्यादी | महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस स्टेशन अधिकारी, पोलीस स्टेशन राळेगाव,ता. राळेगाव जि. यवतमाळ. |
| प्रतिनिधीत्व | शासनातर्फे विद्वान विधिज्ञ श्री. एस. आर. उदापुरकर |
| आरोपी | **मधुकर बापुराव भालेराव**<br>वयः ३५ वर्षे, व्यवसायः शेतमजुरी.<br>रा.वनोजा, ता. राळेगाव जि. यवतमाळ |
| प्रतिनिधीत्व | आरोपी तर्फे विद्वान विधिज्ञ श्री. एम.डी.अलोणे. |

**फॉर्म – ब**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख वेळ व स्थळ | दि. १४.०९.२०१६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजताच्या सुमारास मौ. वनोजा येथे फिर्यादीच्या घरासमोरील अंगणात ता. राळेगाव जि. यवतमाळ. |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | १५.०९.२०१६ |
| दोषारोप निश्चीत केल्याचा दिनांक | ०३.०१.२०१८ |
| पुरावा सुरु होण्याचा दिनांक | ०३.०१.२०१८ |
| ज्या दिवशी निकाल राखुन ठेवला तो दिनांक | निरंक. |
| न्यायनिर्णयाची तारीख | २२.०४.२०२६ |

| | |
|---|---|
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर. | निरंक. |

## फॉर्म – क

| आरोपी अ.क्र. | आरोपीचे नाव | अटकेचा दिनांक | जामीन दिल्याचा दिनांक | गुन्हा | निर्दोष / दोषी | शिक्षा ठोठावली | फौ.प्र.सं.च्या कलम ४२८ च्या उद्देशाने अटकेत ठेवण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **मधुकर बापुराव भालेराव** | १६.०९.२०१६ | १६.०९.२०१६ | भा.दं.वि. कलम ३२४, ५०४,५०६ | निर्दोष | – | – |

## फॉर्म – ड

**फिर्यादी/बचाव पक्ष/न्यायालय/साक्षीदारांची यादी.**

**(अ) फिर्यादी साक्षीदारांची यादी.**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सरकारी सा.क्र.१ | सतीष सुधाकर सोनटक्के | फिर्यादी |
| सरकारी सा.क्र.२ | ज्ञानेश्वर पंजाबराव वटोणे | पंच |
| सरकारी सा. क्र. ३ | भास्कर सखाराम काचोळे | पंच |
| सरकारी सा. क्र. ४ | गंगाधर शंकरराव सावरकर | मेमोरंडम पंच |
| सरकारी सा. क्र. ५ | अर्चना सतिष सोनटक्के | साक्षीदार |
| सरकारी सा. क्र. ६ | सुधाकर मारोतराव सोनटक्के | साक्षीदार |
| सरकारी सा. क्र. ७ | सुमित्रा सुधाकरराव सोनटक्के | साक्षीदार |
| सरकारी सा. क्र. ८ | नामदेव कवडुजी वादाफळे | तपासिक अंमलदार |

**(ब) बचाव पक्ष साक्षीदारांची यादी.**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | | |

**(क) न्यायालय साक्षीदारांची यादी.**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | | |

**फिर्यादी/बचाव पक्ष/न्यायालय/निशाणी क्रमांक यादी.**

**(अ) फिर्यादी नि.क्र.यादी.**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| सरकारी सा.क्र.१ | नि.क्र. १२ | फिर्यादी |
| सरकारी सा.क्र.१ | नि.क्र. १३ | फिर्याद |
| सरकारी सा.क्र १ | नि.क्र. १४ | छापील प्रथम खबर अहवाल |
| सरकारी सा.क्र.२ | नि.क्र.१७ | पंच |
| सरकारी सा.क्र.२ | नि.क्र.१८ | घटनास्थळ पंचनामा |
| सरकारी सा.क्र.३ | नि.क्र. १९ | पंच |
| सरकारी सा.क्र.४ | नि.क्र. २० | मेमोरंडम पंच |
| सरकारी सा.क्र.४ | नि.क्र. २१ | आरोपीचा कबुली जबाब |
| सरकारी सा.क्र.४ | नि.क्र. २२ | जप्ती पंचनामा |
| सरकारी सा.क्र.५ | नि.क्र. ३३ | साक्षीदार |
| सरकारी सा.क्र.६ | नि.क्र. ३७ | साक्षीदार |
| सरकारी सा.क्र.७ | नि.क्र. ३८ | साक्षीदार |
| सरकारी सा.क्र.८ | नि.क्र. ४९ | तपासीक अंमलदार |
| सरकारी सा.क्र.८ | नि.क्र. ५० | अटक पंचनामा |

**(ब) बचाव पक्ष नि.क्र.यादी.**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

**(क) न्यायालय नि.क्र.यादी.**

| अ.क्र. | वर्णन | नि.क्र. |
|---|---|---|
| १ | दोषारोप | (नि.क्र.१०) |

| | | |
|---|---|---|
| २ | आरोपींची जबानी | (नि.क्र.११) |

**(ड) मुद्देमाल वस्तु.**

| अ.क्र. | मुद्देमाल वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

## न्या य नि र्ण य
## (दि. २२.०४.२०२६ रोजी घोषीत)

आरोपी हे भारतीय दंड संहितेच्या कलम ३२४, ५०४, ५०६ अन्वयें खटल्यास सामोरे जात आहेत.

**२.** अभियोग पक्षाचे प्रकरण थोडक्यात असे आहे की, दिनांक १४.०९.२०१६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजताच्या सुमारास फिर्यादी व त्यांची पत्नी सौ अर्चना सतीष सोनटक्के हे दोघे त्यांच्या घरासमोरील अंगणात बसुन असताना आरोपी नामे मधुकर बापुराव भालेराव हा फिर्यादीच्या घरासमोर येवुन फिर्यादीला म्हणत होता की, '' माझ्या मोठ्या भावाचे इलेक्ट्रीक मिटर का चेंज केले'' त्यावेळी फिर्यादी आरोपीस समजावित असताना आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करुन मारण्याच्या धमक्या देत असताना फिर्यादीची पत्नी आरोपीस समजावित असताना आरोपीने त्याच्या हातातील काडीने फिर्यादीच्या पत्नीच्या डोक्यावर मारुन जखमी केले व फिर्यादी व त्यांच्या पत्नीस जिवे मारण्याची धमकी दिली. आरोपी हा केव्हा काय करेल याचा नेम नाही. फिर्यादीने त्यांच्या पत्नीस घेवून पोलिस स्टेशनला येवून तिचे ग्रामीण रुग्णालय राळेगाव येथे उपचार केले त्यांनी फिर्यादीच्या पत्नीस यवतमाळ येथे रेफर केले. सर्व दवाखाण्याचे कागदपत्र घेवून पोलिस स्टेशनला येवून कार्यवाही साठी जबानी रिपोर्ट देत असल्याबाबत फिर्यादीने आरोपी विरुध्द पोलीस स्टेशन राळेगाव येथे तक्रार नोंदविली.

**३.** फिर्यादीच्या तक्रारीवरुन आरोपीविरुध्द गुन्हा क्रमांक २७६/२०१६ भारतीय दंड संहितेच्या कलम ३२४, ५०४, ५०६ अन्वयें नोंदविले. गुन्हयाच्या तपासादरम्यान पंचनामा कार्यवाही करुन, साक्षीदारांची बयाने नोंदविण्यात आली. तपासाअंती आरोपीविरुध्द पुरेसा पुरावा मिळुन आल्याने न्यायालयासमक्ष आरोपपत्र दाखल करण्यात आले.

**४.** अभिलेखावरील संपूर्ण दस्तऐवजांचे अवलोकन करुन आरोपीविरुध्द भारतीय दंड संहितेच्या कलम ३२४, ५०४, ५०६ अन्वयें दोषारोप (नि.क्र.१०) निश्चित केले. आरोपीची जबानी (नि.क्र. ११) नोंदविली. आरोपींना आरोप मराठी भाषेमध्ये वाचुन, समजावुन सांगण्यात आले. आरोपींनी त्यांच्या जबानी दरम्यान गुन्हा कबुल नसल्याचे सांगुन खटल्यास सामोरे जाण्याचे सांगितले, म्हणुन त्यांच्याविरुध्द खटला चालविण्यात आला.

**५.** खटल्यातील पुरावा आणि दोन्ही पक्षांचे युक्तिवाद ऐकल्यानंतर माझेसमक्ष खालील मुद्दे निश्चयार्थ उपस्थित झाले आणि त्यावरील निष्कर्ष मी खालील कारणमिमांसेसह देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्षाने सिध्द केले काय की, दि.१४.०९.२०१६ रोजी सायंकाळी ०५:०० वाजता अगर त्या सुमारास मौ. वनोजा ची ता. राळेगाव जि. यवतमाळ येथील फिर्यादी च्या घरासमोरील अंगणात आरोपी याने फिर्यादीच्या पत्नीला काडीने डोक्यावर मारहाण करून इच्छापुर्वक दुखापत केली ? | ... नाही |
| २. | अभियोग पक्षाने सिध्द केले काय की, उपरोक्त दिवशी, ठिकाणी व वेळी आरोपी याने फिर्याद व त्यांच्या पत्नीला शांतता भंग करण्याच्या उद्देशाने अपमानीत करुन प्रक्षोभित | ... नाही. |

| | | |
|---|---|---|
| | केले? | |
| ३. | अभियोग पक्षाने सिध्द केले काय की, उपरोक्त दिवशी, ठिकाणी व वेळी आरोपीने फिर्यादी व त्यांच्या पत्नीला फौजदारी पात्र धाकदपटशा दाखवला ? | ... नाही. |
| ४. | आदेश काय? | ... अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>कारणमिमांसा</u>

**६.** प्रस्तुत प्रकरणात सरकार पक्षाने आरोपींविरुध्दचे आरोप सिध्द करण्यासाठी एकुण आठ साक्षीदार तपासले असुन सरकारी साक्षीदार क्र.१. सतीष सुधाकर सोनटक्के (फिर्यादी) यांची साक्ष (नि.क्र.१२) वर नोंदविली, सरकारी साक्षीदार क्र.२. ज्ञानेश्वर पंजाबराव वटोणे यांची साक्ष (पंच) यांची साक्ष (नि.क्र.१७) वर नोंदविली, सरकारी साक्षीदार क्र.३. भास्कर सखाराम काचोळे यांची साक्ष (पंच) यांची साक्ष (नि.क्र.१९) वर नोंदविली,सरकारी साक्षीदार क्र.४. गंगाधार शंकरराव सावरकर यांची साक्ष (मेमोरंडम पंच) यांची साक्ष (नि.क्र.२०) वर नोंदविली, सरकारी साक्षीदार क्र.५. अर्चना सतिष सोनटक्के यांची साक्ष (साक्षीदार) यांची साक्ष (नि.क्र.३३) वर नोंदविली, सरकारी साक्षीदार क्र.६. सुधाकर मारोतराव सोनटक्के यांची साक्ष (साक्षीदार) यांची साक्ष (नि.क्र.३७) वर नोंदविली, सरकारी साक्षीदार क्र.७. सुमित्रा सुधाकरराव सोनटक्के यांची साक्ष (साक्षीदार) यांची साक्ष (नि.क्र.३८) वर नोंदविली, सरकारी साक्षीदार क्र.८. नामदेव कवडुजी वादाफळे यांची साक्ष (तपासिक अंमलदार) यांची साक्ष (नि.क्र.४९) वर नोंदविली. याउलट बचाव पक्षातर्फे एकही साक्षीदार तपासण्यात आलेला नाही.

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ३ :–</u>**

७. सदर मुद्यांच्या अनुषंगाने अभिलेखावरील सरकारी साक्षीदार क्र.१. सतीष सुधाकर सोनटक्के (फिर्यादी) यांची साक्ष (नि.क्र.१२) वर नोंदविली, सदर साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन करणे आवश्यक आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासात कथन केले की, घटना अंदाजे १ वर्ष ६ महिण्यापूर्वी फिर्यादीच्या घरासमोर अंगणात सायंकाळी ५.३० वाजताच्या दरम्यान घडली. त्यादिवशी आरोपीच्या मोठ्या भावाच्या घरी फिर्यादी त्याचे इलेक्ट्रीक मिटर ची जागा बदलुन दुस–या जागी फिट करून दिले. त्यामुळे आरोपीने तसे मिटर का फिट केले या कारणावरून फिर्यादीला शिवीगाळ केली. त्यानंतर त्याने फिर्यादीच्या पत्नीच्या डोक्यावर काडी (काठीने) मारले, साक्षीदार स्वताःहून सांगतो की, आरोपी व फिर्यादी मध्ये वादवाद सुरू असतांना फिर्यादीची पत्नी आरोपी समजविण्यासाठी आली असता त्याने वरील कृत्य केले, त्यामुळे फिर्यादीने त्याच्या पत्नीसोबत राळेगाव पोलिस स्टेशन येथे सदर घटनेचा रिपोर्ट देण्यासाठी गेले, तेथे पोलिसांनी फिर्यादीच्या पत्नीला राळेगाव सरकारी दवाखान्यात नेले, तेथून डॉक्टरांनी यवतामळ येथे सरकारी दवाखान्यात रेफर केले. त्यानंतर यवतमाळ येथे दवाखान्यातून घटनेच्या दुस–या दिवशी सुटटी झाल्यानतर फिर्यादीने पोलिस स्टेशन राळेगांव येथे सदर घटनेचा रिपोर्ट दिला. साक्षीदाराला सदरचा रिपोर्ट दाखविण्यात आला तो तोच असून त्यावर त्यांची सही आहे. त्यातील मजकूर साक्षीदाराच्या माहिती प्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी कमांक १३ देण्यात येते. साक्षीदाराला प्रथम दर्शनी अहवाल दाखविण्यात आला तो तोच असून त्यावर त्यांची सही आहे. त्यातील मजकूर त्यांच्या माहिती प्रमाणे खरा व बरोबर आहे त्यास निशाणी कमांक १४ देण्यात येतो. पोलिसांनी फिर्यादीचे घटनेच्या चौकशी दरम्यान बयाण नोंदविले होते. फिर्यादी आरोपीला ओळखतो. सदर साक्षीदाराचा उलटतपास आरोपीच्या

विधिज्ञांनी घेतला त्यामध्ये साक्षीदाराने कथन केले की, फिर्यादीचे इयत्ता १० पर्यत शिक्षण झाले आहे या व्यतिरिक्त त्यांच्या कडे कोणतेही पदवी अथवा डिप्लोमा नाही. फिर्यादी त्यांच्या उलटतपासात मान्य करतात की, त्यांच्याकडे इलेक्ट्रीसियन च्या अनुषंगाने कोणताही डिप्लोमा नाहीत, आरोपी व त्याचा भाउ बंडू है एकाच घरात वेगवेगळ्या रूम मध्ये अलग राहत होते. घटनेच्या १५ दिवस पूर्वी आरोपीच्या घरी बंडू च्या इलेक्ट्रीक मिटर मधुन विजसप्लाय होते. फिर्यादी त्यांच्या उलटतपासात मान्य करतात की, घटना घडली त्या दिवशी आरोपी ने त्यांच्या व त्यांच्या आई वडीलाविरूध्द पोलिस स्टेशन राळेगांव येथे रिपोर्ट दिला होताच, त्या रिपोर्ट नुसार साक्षीदार तिघांविरूध्द तहसिल कार्यालयात केस चालु होती. फिर्यादी त्यांच्या उलटतपासात कथन करतात की, घटना साक्षीदाराने सदरचे इलेक्टीक मिटर एका जागेवरून दुस–या जागी फिट केल्यानंतर १५ दिवसानंतर घडली. घटना घडल्याच्या दोन दिवसानंतर पोलिसांनी फिर्यादीचे बयाण त्यांच्या घरी नोंदविले होते.

८. सदर मुद्यांच्या अनुषंगाने अभिलेखावरील सरकारी साक्षीदार क्र.२. ज्ञानेश्वर पंजाबराव वटोणे यांची साक्ष (पंच) यांची साक्ष (नि.क्र.१७) वर नोंदविली, सदर साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन करणे आवश्यक आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासात कथन केले की, पोलिसांनी साक्षीदाराला त्यांच्या गावात सोनटक्के यांच्या घराजवळ पंचनामा करण्यासाठी बोलाविले होते, त्या ठिकाणी पोलिसांनी त्यांच्या समक्ष लिखापडी करून साक्षीदाराला त्यावर सही करण्यास सांगीतली असता साक्षीदाराने सही केली. साक्षीदाराला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला त्यावर त्यांची सही असून त्यातील मजकूर साक्षीदाराला माहित नाही. साक्षीदाराला घटनास्थळ पंचनाम्यातील मजकूर वाचून दाखविण्यात आला, तो त्यांच्या समक्ष लिहिला होता. घटनास्थळ पंचनामा निशाणी कमांक १८ देण्यात येतो. सदर साक्षीदाराचा उलटतपास आरोपीच्या विधिज्ञांनी घेतला त्यामध्ये

साक्षीदाराने मान्य केले की, पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा हा सुधाकर सोनटक्के यांच्या घरी बसून तयार केला, पोलिसांनी घटनास्थळ पंचनाम्यात काय लिहिले हे साक्षीदाराला माहित नाही. साक्षीदार पुढे मान्य करतात की, साक्षीदाराने पोलिसांच्या म्हणण्यावरून घटनास्थळ पंचनाम्यावर सही केली.

९. सदर मुद्यांच्या अनुषंगाने अभिलेखावरील सरकारी साक्षीदार क्र.३. भास्कर सखाराम काचोळे यांची साक्ष (पंच) यांची साक्ष (नि.क्र.१९) वर नोंदविली, सदर साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन करणे आवश्यक आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासात कथन केले की, घटना घडल्याच्या दुस–या दिवशी पोलिसांनी सतिश सोनटक्के च्या घरी घटनास्थळ पंचनामा तयार करण्यासाठी पंच म्हणून हजर राहण्यासाठी बोलाविले होते, त्या ठिकाणी पोलिसांनी साक्षीदारा समक्ष घटनेचा घटनास्थळ पंचनामा तयार केला त्यानंतर पोलिसांनी तो साक्षीदाराला वाचून दाखविला त्यानंतर त्यावर साक्षीदाराची पोलिसांनी सही घेतली. साक्षीदाराला सदरचा घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला तो तोच असून त्यातील मजकूर साक्षीदाराच्या माहिती प्रमाणे खरा व बरोबर आहे तो निशाणी क्रमांक १८ वर आहे. सदर साक्षीदाराचा उलटतपास आरोपीच्या विधिज्ञांनी घेतला त्यामध्ये साक्षीदाराने कथन केले की, पोलिसांनी साक्षीदाराला घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी पंच म्हणून हजर राहावे या साठी लेखी सुचनापत्र दिले नव्हते. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, साक्षीदाराचे घर सोनटक्के च्या घराच्या बाजुला आहे, त्यानुसार पोलिसांनी साक्षीदाराला तशी तोंडी सुचना दिली होती. पोलिसांनी सदरचा घटनास्थळ पंचनामा अंदाजें ११.०० ते १२.०० वाजताच्या दरम्यान चालु केला. साक्षीदार त्यांच्या उलटतपासात मान्य करतात की, पोलिसांनी त्यांच्या समक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, पोलिसांनी साक्षीदाराला घटनास्थळ पंचनामा सोनटक्के च्या घरी वाचून

दाखविला. साक्षीदाराने यापूर्वी २ ते ३ प्रकरणात पंच साक्षीदार म्हणून न्यायालयात साक्ष दिली आहेत.

**१०.** सदर मुद्यांच्या अनुषंगाने अभिलेखावरील सरकारी साक्षीदार क्र.४. गंगाधार शंकरराव सावरकर यांची साक्ष (मेमोरंडम पंच) यांची साक्ष (नि.क्र.२०) वर नोंदविली, सदर साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन करणे आवश्यक आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासात कथन केले की, पोलिसांनी साक्षीदाराला २ वर्षापूर्वी राळेगांव पोलिस स्टेशन येथे आरोपीचा कबुली जबाब नोदविण्यासाठी पंच म्हणून हजर राहण्यासाठी बोलाविले होते, त्या ठिकाणी आरोपी ने साक्षीदारा समक्ष त्याने त्यांच्या पत्नीला ज्या काठीने मारले ती काठी त्याने त्याच्या घरात वनोजा येथे ठेवली असे सांगीतले होते, तसेच पोलिसांनी आरोपीची तशी जबाणी साक्षीदारा समक्ष लिहून घेतली. साक्षीदाराला ती जबाण दाखविण्यात आली. ती तीच असून त्यावर साक्षीदाराची पंच म्हणून सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी कमांक २१ देण्यात येतो. साक्षीदार त्यांच्या सरतपासात पुढे कथन करतात की, त्यानुसार साक्षीदार, पोलिस व आरोपी असे मिळून पोलिसांच्या गाडीतून आरोपीच्या गावी वनोजा येथे गेले. आरोपीने साक्षीदाराला त्याच्या घरी नेले व त्याने त्याच्या घरातून एक लाकडाची काडी काढून दाखविली. पोलिसांनी ती काडी जप्तीपंचनामा तयार करून जप्त केली. साक्षीदाराला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला तो तोच असून त्यावर साक्षीदाराची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी कमांक २२ देण्यात येतो. ज्या व्यक्तीने ती काठी काढून दिली त्या व्यक्तीला साक्षीदार ओळखतो तो न्यायालयात हजर आहे. सदर साक्षीदाराचा उलटतपास आरोपीच्या विधिज्ञांनी घेतला त्यामध्ये साक्षीदाराने कथन केले की, साक्षीदाराने या पूर्वी १० ते १५ वेळा न्यायालयात संबधीत प्रकरणामध्ये साक्ष दिली आहे. पोलिस स्टेशन पासून साक्षीदाराच्या घर १ फरलांग च्या

अंतरावर आहे. पोलिसांनी साक्षीदाराला आरोपीचा कबुली जबाब नोंदविण्यासाठी कोणतेही लेखी सुचनापत्र दिले नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, पोलिसांनी साक्षीदाराला फोन करून पोलिस स्टेशनला बोलाविले. साक्षीदार मान्य करतात की, पोलिसांना जेव्हा जेव्हा पंच साक्षीदार संबधीत केस मध्ये पाहिजे असतो त्यावेळेस पोलिस साक्षीदाराला फोन करून पोलिस स्टेशनला बोलाविते. पोलिसांनी साक्षीदाराला आरोपीचा कबुली जबाब नोंदविण्यासाठी सकाळी ९.०० वाजताच्या दरम्यान पोलिस स्टेशनला बोलाविले होते.

**११.** सदर मुद्यांच्या अनुषंगाने अभिलेखावरील सरकारी साक्षीदार क्र.५. अर्चना सतिष सोनटक्के यांची साक्ष (साक्षीदार) यांची साक्ष (नि.क्र.३३) वर नोंदविली, सदर साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन करणे आवश्यक आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासात कथन केले की, घटना अंदाजे २ वर्षापूर्वी साक्षीदाराच्या घरी गेट जवळ सायंकाळी ४. ते ५.०० वाजताच्या दरम्यान घडली. साक्षीदाराच्या पतीमध्ये व आरोपीमध्ये भांडण झाले होते. ते भांडण कोणत्या कारणावरून झाले हे साक्षीदाराला माहित नाही. त्या भांडणाच्या कारणावरून आरोपीने साक्षीदार त्यांच्या घराच्या गेट जवळ बसली असता वेळुच्या काडीने साक्षीदाराच्या डोक्यात मारले, त्यामुळे साक्षीदाराला तेथे जमलेल्या लोकानी उचलुन शासकीय दवाखाना राळेगांव येथे दाखल केले होते. पोलिसांनी साक्षीदाराचे घटनेच्या चौकशी दरम्यान बयाण नोंदविले होते. साक्षीदार आरोपीला ओळखतो. सदर साक्षीदाराचा उलट तपास आरोपीच्या विधिज्ञांनी घेतला त्यामध्ये साक्षीदाराने कथन केले की, घटना घडल्यानंतर ८ दिवसांनी पोलिसांनी साक्षीदाराचे बयाण नोंदविले होते. पोलिसांनी साक्षीदाराचे बयाण राळेगांव येथे नोंदविले होते. साक्षीदाराचे घरासमोर सिमेंट रोड नसुन डांबर रोड आहे. साक्षीदाराने पोलिसांना घटनेच्या चौकशी दरम्यान बयाण देते वेळेस, " मी माझया घराच्या गेट जवळ बसली होती" ही बाब सांगीतली होती परंतु सदरची बाब

पोलिसांनी साक्षीदाराच्या बयाणात का नमूद केली नाही याची कारण साक्षीदाराला माहित नाही, साक्षीदाराला माहित नाही की, आरोपीने सदरच्या प्रकरणापूर्वी त्यांचे पती, सासु सासरे यांच्या विरूध्द पोलिस स्टेशनला रिपोर्ट दिला होता किंवा कसे?

**१२.** सदर मुद्यांच्या अनुषंगाने अभिलेखावरील सरकारी साक्षीदार क्र.६. सुधाकर मारोतराव सोनटक्के यांची साक्ष (साक्षीदार) यांची साक्ष (नि.क्र.३७) वर नोंदविली, सदर साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन करणे आवश्यक आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासात कथन केले की, घटना १ वर्षापूर्वी साक्षीदाराच्या घरापाशी सायंकाळी ५.०० वाजता घडली होती: घटनेच्या वेळी साक्षीदाराची सुन अंगणात झाडू मारत होती तितक्यात आरोपी हा काठी घेवून आला व त्याने साक्षीदाराच्या सुनेच्या डोक्यात काठीने मारहाण केली, त्यानंतर साक्षीदाराने त्यांच्या सुनेला राळेगाव च्या पोलिस स्टेशन येथे आरोपी विरोधात रिपोर्ट नोंदविण्याकरीता घेवून आले, तेथून साक्षीदाराच्या सुनेला यवतमाळ येथे रूग्नालयात दाखल करण्यात आले. आरोपीने दारूच्या नेशेत साक्षीदाराच्या मुलाला मारहाण केली त्याचे कारण साक्षीदाराने विचारले असता सदरचे भांडण झाले होते. पोलिसांनी साक्षीदाराचे बयाण नोंदविले होते. साक्षीदार आरोपीला ओळखतो तो  न्यायालयात हजर आहे. सदर साक्षीदाराचा उलटतपास आरोपीच्या विधिज्ञांनी घेतला त्यामध्ये साक्षीदाराने मान्य केले की, आरोपीने साक्षीदार व त्यांच्या मुलाच्या व त्यांच्या पत्नीच्या विरोधात पोलिस स्टेशन राळेगाव येथे रिपोर्ट नोंदविला आहे. फिर्यादी हा साक्षीदाराचा मुलगा आहे. साक्षीदाराने पोलिसांना घटनेच्या वेळी त्यांची सुन अंगणात झाडू मारत होती व तितक्यात आरोपी हा काठी घेवून आला ही बाब साक्षीदाराचे बयाण नोंदवितांना सांगीतली होती, तसेच आरोपीने दारूच्या नशेत साक्षीदाराच्या मुलाला मारहाण केली त्याचे कारण साक्षीदाराने विचारले असता सदरचे भांडण झाले होते, सदरची बाब पोलिसांनी साक्षीदाराचे बयाणात का

नोंदविले नाही याचे कारण साक्षीदाराला सांगता येणार नाही.

**१३.** सदर मुद्यांच्या अनुषंगाने अभिलेखावरील सरकारी साक्षीदार क्र.७. सुमित्रा सुधाकरराव सोनटक्के यांची साक्ष (साक्षीदार) यांची साक्ष (नि.क्र.३८) वर नोंदविली, सदर साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन करणे आवश्यक आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासात कथन केले की, घटना अंदाजे अडीच वर्षापूर्वी साक्षीदाराच्या घराच्या अंगणात सायंकाळी ५.०० वाजता घडली होती. आरोपीच्या भावाने त्याच्या घरातील मिटर काढले व साक्षीदाराच्या मुलास मिटर बसवून दे असा तगादा लावत होता. आरोपी काडी घेवून आला व साक्षीदाराच्या सुनेच्या डोक्यात मारले त्यामुळे साक्षीदाराच्या सुनेचे डोके फुटले व ती खाली पडली. त्यानंतर साक्षीदाराने त्याच्या सुनेला घेवून पोलिस स्टेशन येथे आरोपी विरोधात रिपोर्ट नोंदविला. पोलिसांनी साक्षीदाराचे बयाण नोंदविले होते. साक्षीदार आरोपीला ओळखतो तो न्यायालयात हजर आहे. सदर साक्षीदाराचा उलटतपास आरोपीच्या विधिज्ञांनी घेतला त्यामध्ये साक्षीदाराने मान्य केले की, साक्षीदाराने पोलिसांना आरोपीच्या भावाने त्याच्या घरातील मिटर काढले व साक्षीदाराच्या मुलास मिटर बसवून दे असा तगादा लावत होता तसेच आरोपी काडी घेवून आला व साक्षीदाराच्या सुनेच्या डोक्यात मारले त्यामुळे साक्षीदाराच्या सुनेचे डोके फुटले व ती खाली पडली बयाण देते वेळेस सांगीतले होते. सदरची बाब पोलिसांनी का नमुद केली नाही याचे कारण साक्षीदाराला सांगता येणार नाही.

**१४.** सदर मुद्यांच्या अनुषंगाने अभिलेखावरील सरकारी साक्षीदार क्र.८. नामदेव कवडुजी वादाफळे यांची साक्ष (तपासिक अंमलदार) यांची साक्ष (नि.क्र.४९) वर नोंदविली. सदर साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन करणे आवश्यक आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासात कथन केले की, साक्षीदार दिनांक १५.०९.२०१६ रोजी पोलिस स्टेशन राळेगाव येथे

पोलिस जमादार या पदावर कार्यरत होते. दिनांक १६.०९.२०१६ रोजी अपराध कमांक २७६/२०१६ कलम ३२४,५०४,५०६, भा.द.वी तपास काम साक्षीदारा कडे वर्ग करण्यात आले होते. त्याप्रमाणे साक्षीदार घटनास्थळ पंचनाम्याकरीता वनोजा येथे फिर्यादीच्या घरी गेले. दोन पंचांना घटनास्थळ पंचनामा करीता हजर राहण्याबाबत तोडी सुचना दिली. घटनास्थळावर गेल्यानंतर फिर्यादी व पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला. साक्षीदाराला घटनास्थळ पंचनामा नि क १८ दाखवीण्यात आला त्यावर त्यांची व दोन पंचाची सहया आहेत त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. साक्षीदार त्यांच्या सरतपासात पुढे कथन करतात की, साक्षीदाराने फिर्यादी व साक्षदारांचे सांगण्याप्रमाणे त्यांचे बयान नोंदवीले होते, त्यानंतर साक्षीदाराने आरोपीला अटक केली. साक्षीदाराला अटक पंचनामा दाखवीण्यात आला, त्यावर साक्षीदाराची आरोपी व पंचाच्या सहया आहेत त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे त्यास नी क ५० देण्यात आला. त्यानंतर साक्षीदाराने दोन पंचासमक्ष आरोपीचा कबुली जबाब नोंदवीला साक्षीदाराला आरोपीचा जबाब नि क २१ दाखवीण्यात आला त्यावर दोन पंच, आरोपी व साक्षीदाराची सही आहे. आरोपीच्या सांगण्याप्रमाणे कबुली जबाब नोंदवीण्यात आला. साक्षीदार त्यांच्या सरतपासात पुढे कथन करता की, त्यानंतर साक्षीदार, दोन पंच व आरोपी असे मीळुन आरोपीच्या गावी वनोजा येथे गेलो आरोपीने त्याच्या घरातुन वेळवाची काठी काढुन दिली, पंचा समक्ष आरोपीने काढुन दिलेल्या काठीचा जप्ती पंचनामा नि क २२ प्रमाणे तयार केला. साक्षीदाराला जप्ती पंचनामा नि क २२ दाखवीण्यात आला त्यावर आरोपी दोन पंच व साक्षीदाराची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यानंतर साक्षीदाराने आरोपीस न्यायालयात हजर केले. त्यानंतर आरोपी विरूध्द पुरावा मिळुन आल्याने साक्षीदाराने दोषारोपपत्र दाखल केले. सदर साक्षीदाराचा उलटतपास आरोपीच्या विधिज्ञांनी घेतला त्यामध्ये साक्षीदाराने कथन केले

की,साक्षीदाराने साक्षीदार क ०७ सुमीत्रा हीचे बयान नोंदवीले होते. सदर साक्षीदाराने बयान देते वेळी " आरोपीच्या भावाने त्याच्या घरातील मिटर काढले व माझया मुलास मिटर बसवुन दे असा तगादा लावीत होता, बाब सांगीतली नाही तसेच साक्षीदार क ०७ हीने तीचे बयानामध्ये " काडी घेवुन आला, ती खाली पडली " ही बाब सांगीतली नव्हती. साक्षीदाराने साक्षदार क ०६ सुधाकर यांचे बयान नोंदवीले होते. सदर साक्षीदाराने बयान देते वेळी घटनेच्या वेळी त्यांची सुन अंगणात झाडु मारत होती, इतक्यात आरोपी काठी घेवुन आला, आरोपीने दारूच्या नशेत त्यांच्या मुलास मारहान केली, त्याचे कारण साक्षीदाराने विचारले असता सदरचे भांडण झाले होते या बाबी सांगतल्या नव्हत्या. साक्षीदार त्यांच्या उलटतपासात कथन करतात की, साक्षीदाराने साक्षदार क ०५ अर्चना हीचे बयान नोंदवील होते सदर साक्षदाराने बयान देते वेळी साक्षीदार त्यांच्या घराच्या गेट जवळ बसली होती ही बाब सांगीतली नव्हती. साक्षीदार हा साक्षदार गंगाधर सावरकर यांना ओळखतो, तो अनेक केसमध्ये पंच म्हणून हजर असतो. तो पोलीस स्टेशनचा नेहमीचा साक्षदार आहे. आरोपीचा कबुली जबाब नि क २१ दिनांक १६.०९.२०१६ रोजी सकाळी ९.३० वाजता चालु केला, तो जबाब दहा मिनीटात नोंदवीला. निक २१ कबुली जबाब नोंदवील्यानंतर आरोपीच्या गावी जाण्याकरीता स्टेशन डायरी मध्ये नोंद घेतली होती. त्याबाबतची नोंदीची प्रत दोषारोपपत्रासोबत दाखल केली नाही.

**१५.** सरकारी विधीज्ञ व आरोपींचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील सरकारी साक्षीदारांचे साक्षीचे अवलोकन केले, सरकारी साक्षीदार क्र.१. सतिष सुधाकर सोनटक्के यांची साक्ष (फिर्यादी) यांची साक्ष (नि.क्र.१२) वर नोंदविली. फिर्यादीने त्यांच्या सरतपासामध्ये नेमकी शिवीगाळ आरोपीने काय केली हे सांगितले नाही. फिर्यादीने त्यांच्या सरतपासात आरोपीने जिवे मारण्याची धमकी दिल्या बद्दल कोणतेही

कथन केले नाही. फिर्यादीने त्यांच्या उलटतपासात मान्य केले की, घटना घडली त्या दिवशी आरोपीने फिर्यादी व त्याच्या आईवडीलाविरुध्द पोलिस स्टेशन राळेगाव येथे रिपोर्ट दिला होता त्या रिपोर्ट नुसार त्यांच्या तिघा विरुध्द तहसील कार्यालयात केस चालु होती. फिर्यादी व आरोपीमध्ये फौजदारी वाद असल्याचे दिसुन येते. फिर्यादीने कथन केले की, घटना घडल्यानंतर दोन दिवसानंतर फिर्यादीचे बयाण पोलिसांनी फिर्यादीच्या घरी नोंदविले होते. फिर्यादीने त्यांच्या सरतपासात कथन केले की, आरोपीने फिर्यादीच्या पत्नीच्या डोक्यावर काठीने मारले. अभियोग पक्षाने फिर्यादीला त्यांच्या सरतपासात जप्त काठी दाखविली नाही. सदर प्रकरणात अभियोग पक्षाने वैद्यकीय अधिकारी यांना तपासले नाही त्यामुळे सदर प्रकरणात वैद्यकीय प्रमाणपत्र सिध्द झाले नाही. सरकारी साक्षीदार क्र.२. ज्ञानेश्वर यांची साक्ष (घटनास्थळपंच ) यांची साक्ष (नि.क्र.१७) वर नोंदविली. सदर साक्षीदाराने त्यांच्या सरतपासात कथन केले की, घटनास्थळ पंचनाम्यातील मजकूर साक्षीदाराला माहित नाही. सदर साक्षीदाराने त्यांच्या उलटतपासात मान्य केले की, पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा हा सुधाकर सोनटक्के यांच्या घरी बसुन केला. निशाणी १८ वरील घटनास्थळ पंचनाम्याचे अवलोकन केले असता घटनास्थळ जागा ही फिर्यादीचे घरासमोर मौजे वनोजा येथे नमूद आहे. सदर साक्षीदाराने सांगितलेले घटनास्थळ पंचनामा झाला व निशाणी १८ वरील घटनास्थळ पंचनामा ठिकाण हे वेगवेगळे असल्याचे दिसुन येते. सदर साक्षीदाराने त्यांच्या उलटतपासात मान्य केले की, पोलिसांनी घटनास्थळ पंचनाम्यात काय लिहिले हे साक्षीदाराला माहित नाही. साक्षीदार पुढे मान्य करतात की, साक्षीदाराने पोलिसांच्या म्हणण्यावरुन घटनास्थळ पंचनाम्यावर सही केली. सदर साक्षीदाराच्या साक्षीवरुन घटनास्थळ पंचनामा सिध्द होत नाही. सरकारी साक्षीदार क्र.३. भास्कर यांची साक्ष (घटनास्थळ पंच) यांची साक्ष (नि.क्र.१९) वर नोंदविली. सदर साक्षीदाराने त्यांच्या

सरतपासात कथन केले की, घटना घडल्याच्या दुसऱ्या दिवशी पोलिसांनी सतीष सोनटक्के च्या घरी घटनास्थळ पंचनामा तयार करण्यासाठी पंच म्हणुन हजर राहण्यासाठी बोलाविले होते, त्याठिकाणी पोलिसांनी साक्षीदारासमक्ष घटनेचा घटनास्थळ पंचनामा तयार केला. निशाणी १८ वरील घटनास्थळ पंचनाम्याचे अवलोकन केले असता सदर साक्षीदार यांनी सांगितलेले घटनास्थळ ठिकाणी व निशाणी १८ मध्ये नमुद घटनास्थळ ठिकाण हे वेगवेगळे असलयाचे दिसुन येते. सदर साक्षीदाराने त्यांच्या उलटतपासात कथन केले की, पोलिसांनी साक्षीदाराला घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी पंच म्हणुन हजर राहावे या साठी लेखी सुचनापत्र दिले नव्हते. सदर साक्षीदाराने त्यांच्या उलटतपासात मान्य केले की, पोलिसांनी साक्षीदारासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, पोलिसांनी साक्षीदाराला घटनास्थळ पंचनामा सोनटक्केच्या घरी वाचून दाखवला. सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये घटनास्थळ पंचनामा सिध्द होत नाही. सरकारी साक्षीदार क्र.४. गंगाधर यांची साक्ष (मेमोरंडम पंच) यांची साक्ष (नि.क्र.२०) वर नोंदविली. सदर साक्षीदाराने त्यांच्या सरतपासात कथन केले की, पोलिसांनी साक्षीदाराला दोन वर्षापुर्वी राळेगाव पोलिस स्टेशन येथे आरोपीचा कबुली जबाब नोंदविण्यासाठी पंच म्हणुन हजर राहण्यासाठी बोलाविले होते, त्याठिकाणी आरोपीने साक्षीदारासमक्ष त्याने त्याच्या पत्नीला ज्या काठीने मारले ती काठी त्याने त्याच्या घरात वनोजा येथे ठेवली असे सांगितले होते, तसेच पोलिसांनी आरोपीची तशी जबाणी साक्षीदारासमक्ष लिहुन घेतली. निशाणी २१ व निशाणी २२ वरील जबानीचे अवलोकन केले असता आरोपीने फिर्यादीची पत्नी अर्चना हिचे डोक्यावर ज्या वेळवाच्या काठीने मारून डोके फोडले ती वेळवाची काठी आरोपीच्या घराचे कपाटात लपून ठेवली आहे तुम्ही सोबत चला मी तुम्हाला काढून देतो, त्याप्रमाणे पंचा समक्ष आरोपीने एक वेळवाची काठी काढून दिली. सदर निशाणी २१ वर पंच म्हणून गंगाधर

शंकर सावरकर यांची साक्षीदार म्हणून नाव व सही आहे. निशाणी २० वर गंगाधर यांनी त्यांच्या सर तपासात कथन केले की, त्या ठिकाणी आरोपीने साक्षीदारासमक्ष त्याने त्यांच्या पत्नीला ज्या काठीने मारले ती काठी त्याने त्याच्या घरात वनोजा येथे ठेवली असे सांगितले होते तसेच पोलिसांनी आरोपीची तशी जबानी साक्षीदारा समक्ष लिहून घेतली. सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये व निशाणी २१ वरील पंचनामा मधील मजकूर मध्ये तफावत आहे त्यामुळे निशाणी २१ व निशाणी २२ वरील मेमोरेंडम पंचनामा सदर साक्षीदाराच्या साक्षी मधून सिद्ध झाला नाही. सरकारी साक्षीदार क्रमांक ५ अर्चना यांची साक्ष निशाणी ३३ वर नोंदवली. सदर साक्षीदाराने त्यांच्या सर तपासात घटना अंदाजे २ वर्षापूर्वी त्यांच्या घरी गेट जवळ सायंकाळी ४.०० ते ५.०० वाजताच्या दरम्यान घडल्याचे कथन केले. निशाणी १३ वरील फिर्यादमधील नमूद मजकुराचे अवलोकन केले असता, घटना दिनांक १४.०९.२०१६ रोजी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास घडल्याचे नमूद आहे तसेच फिर्यादी यांची निशाणी १२ वरील साक्ष मध्ये फिर्यादी यांनी त्यांच्या सर तपासात कथन केले की, घटना अंदाजे एक वर्ष सहा महिने पूर्वी फिर्यादीच्या घरासमोर अंगणात ५.३० वाजता दरम्यान घडली. सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये व निशाणी १३ वरील फिर्याद मध्ये तसेच फिर्यादीच्या निशाणी १२ वरील साक्ष मध्ये घटना घडल्याची वेळ बाबत तफावत दिसून येते. साक्षीदाराने त्यांच्या सर तपासात कथन केली की भांडण कोणत्या कारणावरून झाले हे त्यांना माहित नाही. सदर साक्षीदाराने त्यांच्या सर तपासात कथन केले की, त्या भांडणाच्या कारणावरून आरोपीने साक्षीदार त्यांच्या घराच्या गेट जवळ बसले असता वेळूच्या काठीने साक्षीदाराच्या डोक्यात मारले, असे कथन केले. अभियोग पक्षाने अभिलेखावर दाखल जप्त काठी साक्षीदाराला दाखवली नाही. सदर प्रकरणांमध्ये अभियोग पक्षाने वैद्यकीय अधिकारी यांचे साक्षी नोंदवली नाही त्यामुळे वैद्यकीय प्रमाणपत्र सिद्ध झाले

नाही. सदर साक्षीदाराने त्यांच्या उलट तपासात कथन केले की, घटना घडल्यानंतर ८ दिवसांनी पोलिसांनी साक्षीदाराचे बयान नोंदवले. अभिलेखा वरील दाखल कागदपत्राचे अवलोकन केले असता पोलिसांनी सदर साक्षीदाराचे जबाब दिनांक १६.०९.२०१६ रोजी नोंदविल्याचे दिसून येते व निशाणी १३ प्रमाणे घटनाही दिनांक १४.०९.२.१६ रोजीची आहे. सदर साक्षीदाराने त्यांच्या साक्षीमध्ये त्यांना शिवीगाळ केल्याचे अथवा आरोपीने जीवे मारण्याची धमकी दिल्याबद्दल काहीही सांगितले नाही. सरकारी साक्षीदार क्रमांक ६ सुधाकर यांची साक्ष निशाणी ३७ वर नोंदवली. सदर साक्षीदाराच्या साक्षी चे अवलोकन केले असता, आरोपी व फिर्यादी मध्ये फौजदारी वाद असल्याचे दिसून येते तसेच सदर साक्षीदाराने आरोपीने घटनेच्या वेळी फिर्यादीला अथवा त्यांच्या पत्नीला शिवीगाळ अथवा जिवे मारण्याची धमकी दिल्या बाबत कोणतेही कथन केले नाही. अभियोग पक्षाने सदर प्रकरणात वैद्यकीय अधिकारी यांची साक्ष घेतली नाही त्यामध्ये सदर प्रकरणामध्ये वैद्यकीय प्रमाणपत्र सिध्द झाले नाही, सरकारी साक्षीदार क्रमांक ७ सुमित्रा यांची साक्ष निशाणी ३८ वर नोंदवली. सदर साक्षीदाराने त्यांच्या सर तपासात कथन केले की, आरोपी काडी घेऊन आला, व साक्षीदाराच्या सुनेच्या डोक्यात मारले त्यामुळे साक्षीदाराच्या सुनेचे डोके फुटले व ती खाली पडली त्यानंतर साक्षीदार त्यांच्या सुनेला घेऊन पोलीस स्टेशन येथे आरोपी विरोधात रिपोर्ट नोंदवला. सदर प्रकरणात अभियोग पक्षाने सदर साक्षीदाराला काठी (काडी) सर तपासामध्ये दाखवली नाही. सदर प्रकरणात अभियोग पक्षाने वैद्यकीय अधिकारी यांना तपासले नाही त्यामुळे सदर प्रकरणातील वैद्यकीय प्रमाणपत्र सिद्ध झाले नाही. सदर साक्षीदाराने त्यांच्या सर तपासात आरोपीने फिर्यादी अथवा त्यांच्या पत्नीला शिवीगाळ अथवा जिवे मारण्याची धमकी दिल्या बाबत कोणतेही कथन केले नाही. सरकारी साक्षीदार क्रमांक ८ नामदेव यांची साक्ष निशाणी ४९ नोंदवली. सदर साक्षीदाराच्या साक्षीचे

अवलोकन केले, अभिलेखावर नमूद साक्षीदाराचे साक्षीचे अवलोकन केले असता आरोपीचा कबुली जबाब सिद्ध होत नाही तसेच आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये फौजदारी वाद असल्याचे दिसून येते, अभियोग पक्षाला पुरेशी संधी असून देखील त्यांनी सदर प्रकरणात वैद्यकीय अधिकारी यांना तपासले नाही त्यामुळे वैद्यकीय प्रमाणपत्र सिद्ध झाले नाही त्यामुळे फिर्यादमध्ये नमूद प्रमाणे घटना घडल्या बाबत संशय निर्माण होतो.

**१६.** भारतीय दंड संहितेच्या कलम ३२४,५०४, ५०६ अन्वये मधील तरतुदींचे अवलोकन केले असता, प्रस्तुत प्रकरणात सरकार पक्षाने सदर तरतुदींच्या अनुषंगाने कोणताही तोंडी अथवा प्रत्यक्षदर्शी असा आरोपी विरुध्द सबळ पुरावा अभिलेखावर आलेला नाही, म्हणून आरोपी यांनी वरील कलमांतर्गत कृत्य केले असे आपल्याला पुराव्याअभावी निश्चितपणे म्हणता येणार नाही, म्हणुन पुराव्याअभावी उत्पन्न होणाऱ्या संशयाचा फायदा आरोपी यांना देणे न्यायोचित ठरते. परिणामी, सरकार पक्षाने आरोपींविरुध्दचे आरोप संशयाच्या पलिकडे सिध्द न केल्यामुळे आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. म्हणुन वरील चर्चेच्या आधारे मी मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.४ च्या निष्कर्षासाठी मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी नामे, **मधुकर बापुराव भालेराव** रा. वनोजा, ता. राळेगाव, जि. यवतमाळ यांची फौजदारी प्रक्रिया संहिता २०२३ चे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड संहितेच्या कलम ३२४, ५०४, ५०६ अन्वये शिक्षापात्र गुन्हयाच्या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपी यांचे जामीन व वैयक्तीक बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. खटल्यातील जप्त मुद्देमाल एक वेळवाची काठी लांबी अंदाजे ५४ इंच वरचे बाजुस गोलाई ३ इंच खालचे बाजूस गोलाई ४ इंच १९ खाडे असलेली मुद्देमाल मुल्यहीन असल्याने सदर जप्त मुददेमाल अपिलकालावधीनंतर नियमाप्रमाणे नष्ट करण्यात यावा.

४. आरोपी यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७–अ प्रमाणे **प्रत्येकी** रक्कम रू.१५,०००/– (पंधरा हजार) जामीन व बंधपत्र ़दयावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्घोषीत करण्यात आला.)

RAMCHANDRA DATTATRAYA MANE

Digitally signed by RAMCHANDRA DATTATRAYA MANE
Date: 2026.04.22 03:43:40 +0530

**स्थळ– राळेगाव.**

**दिनांकः २२.०४.२०२६**

**(रामचंद्र दत्तात्रय माने)**

प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी राळेगाव,

ता. राळेगाव, जि. यवतमाळ.

**प्रमाणपत्र**

मी अशी खात्री देतो की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकुर मुळ न्यायानिर्णयाप्रमाणे / आदेशाप्रमाणे बरोबर आहेत.

लिपिकाचे नाव – श्री. जी. व्ही. चव्हाण
न्यायालयाचे नाव – सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर व न्यायदंडाधिकारी वर्ग–१, राळेगांव.

| | |
|---|---|
| आदेश दिनांक | : २२.०४.२०२६ |
| पिठासीन अधिका–यानी स्वाक्षरी केलेली तारीख | : २२.०४.२०२६ |
| आदेश/ न्यायनिर्णय अपलोड केलेली तारीख | : २२.०४.२०२६ |